महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,उरुण-इस्लामपूर

ता.वाळवा, जि. सांगली

## प्रेमचंद जयंती अहवाल

दिनांक 31.07.2025

शुक्रवार दि. 31.07.2025 रोजी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये प्रेमचंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून इतिहास विभाग प्रमुख प्रा. सचिन गरुड यांच्या हस्ते मृद्गंध या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. याकरिता विद्यार्थांनी प्रेमचंद यांच्या जीवन व साहित्यावर आधारित विविध लेख लिहिले होते.

सदर भित्तीपत्रकाचे उद्घाटन प्रसंगी प्रा. सचिन गरुड यांनी हिंदी उपन्यास सम्राट प्रेमचंद व महान गायक मोहम्मद रफी यांच्या विषयी माहिती देऊन प्रेमचंद यांच्या जीवन व साहित्यावर लेखन केलेल्या विद्यार्थांचे कौतुक केले.

तसेच शुक्रवार दि. 01.08.2025 रोजी 'प्रेमचंद के साहित्य की प्रासंगिकता' या विषयावर अभ्यागत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कला शाखेचे अदिष्ठाता प्रा. संतोष नांगरे तर अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाश आठवले हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना प्रा.संतोष नांगरे यांनी प्रेमचंद यांच्या साहित्याचा आढावा घेत त्यांच्या कथा आजही किती प्रासंगिक आहेत ते सांगितले. तर अध्यक्षीय भाषण करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश आठवले यांनी प्रेमचंद यांच्या मोजक्या कथांची उदाहरणे देत त्या आजही किती वास्तववादी व आदर्शवादी आहेत ते पटवून दिले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. अश्विनी थोरात यांनी तर आभार कु. सानिया सनदी हिने मानले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




विद्यार्थांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. संतोष नांगरे.




विद्यार्थांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आठवले.